# पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड
## पोलीस उप आयुक्त (गुन्हे)

# प्रेसनोट दि.०२/१२/२०२२

## गुंडा विरोधी पथकाने एका आठवडयात ०७ आरोपींना ताब्यात घेवुन ०३ गावठी पिस्तुले, ११ काडतुसे, ०६ लोखंडी कोयते, टोयोटा ग्लेन्झा कार व रिक्षा केली हस्तगत

- दि.३०/११/२०२२ रोजी वाकड पोलीस ठाणे गु.र.नं. ९१९/२०२२, भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३,५ (२५) सह १३५ कलम महाराष्ट्र पोलीस कायदा ३७(१)(३)सह १३५ या गुन्हयात फरार असलेला आरोपी **तुषार ऊर्फ आप्पा सुभाष गोगावले**, वय २९ वर्षे, रा. प्रेरणा रेसीडेन्सी फलॅट नं. ८, ज्ञानदीप शाळेजवळ, जुना टोल नाका, वडगाव बुाा, पुणे यास गुन्हयात अटक करुन त्याचेकडे तपास करुन कि.रु. **६,५५,५००/- रु. ची टोयाटो ग्लेन्झा कार क्र. एम.एच.१२/यु.जे./१५८५ व ०३ गावठी पिस्तुले, ११ काडतुसे** जप्त करण्यात आलेली आहे, सदर आरोपीकडे सखोल तपास करण्याकरीता त्यास मा. न्यायालयात हजर करुन त्याची दि.०३/१२/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली आहे, सदरचा आरोपी हा पुणे शहर व पुणे ग्रामिण पोलीस अभिलेखावरील कुख्यात गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी **खुन ०२ गुन्हे, खुनाचा प्रयत्नाचे ०२ गुन्हे, दरोडयाचा प्रयत्नाचा ०१ गुन्हा व गर्दी मारामारीचा ०१** असे गुन्हे दाखल असुन नुकताच तो मोक्का कलम लागलेल्या गुन्हयातुन जामिनावर बाहेर आलेला आहे.

- तसेच दि.२८/११/२०२२ रोजी एका रिक्षा ड्रायव्हरला काही लोक मारत असल्याची व्हिडीओ क्लिप सोशल मिडीयावर प्रसारीत झाल्याने गुंडा विरोधी पथकाचे सुनिल चौधरी यांना मिळालेल्या माहीतीचे आधारे इसम नामे १. अर्जुन हिरामन धांडे, वय १८ वर्षे, राहणार एच.डी.एफ.सी. कॉलनी समोर, वडारवस्ती, चिंचवड,पुणे २. सचिन संतोष गायकवाड, वय १९ वर्षे, रा. सदर ३. विधी संघर्षित बालक रा. सदर यांना ६०,७००/- रु. ची **०१ रिक्षा व ०५ लोखंडी कोयत्यांसह** ताब्यात घेवुन एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणे गु.र.नं. ६९०/२०२२, भा.हत्यार का. कलम ४,२५ महा.पो. ॲ.कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करुन आरोपींना पुढील कारवाई साठी एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले आहे.

- दि.२७/११/२०२२ रोजी गुंडा विरोधी पथकाचे अधिकारी व स्टाफ असे देहुरोड पोलीस ठाणेच्या हददीत पेट्रोलींग करीत असताना, "कुख्यात तडीपार आरोपी चांडया हा मुंबईला जाण्याच्या तयारीत असुन तो सायंकाळी देहुगाव रोडवर, पेट्रोलपंपाजवळ, देहुरोड पुणे या ठिकाणी येणार आहे" अशी बातमी मिळताच सदर ठिकाणी सापळा रचुन **अतुल ऊर्फ चांडया अविनाश पवार, वय २८ वर्षे, रा. व्ही./०६, मिलींदनगर पिंपरी, पुणे** यास शिताफिने ताब्यात घेतले. सदरचा आरोपीस पुणे जिल्हयातुन ०२ वर्षाकरीता तडीपार केले असुन, तडीपार असताना त्याने त्याचे साथिदारांसह **पिंपरी पोलीस ठाणे गु.र.नं.२६९/२०२२,भादवि ३०७,३२३,५०४, ५०६,३४ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२७), क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७** हा गुन्हा केलेला असुन, सदरचा गुन्हा घडले पासुन तो मिळुन येत नव्हता. तडीपार आरोपी अतुल ऊर्फ चांडया अविनाश पवार याचेवर पिंपरी, चिंचवड,

वाकड व हिंजवडी परीसरात खुन, खुनाचा प्रयत्न, गर्दी मारामारी, पिस्तुल व कोयते, तलवारी बाळगुन एकुण १९ गंभिर गुन्हे दाखल आहेत. आरोपीच्या विरोधात देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं. ७२१/२०२२, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन पुढील कारवाईकरीता देहुरोड पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले असुन त्यास पिंपरी पोलीस स्टेशनच्या वरील गुन्हयात अटक करणेकरीता वर्ग करुन घेणार आहेत.

- दि. २६/११/२०२२ रोजी **तडीपार** आरोपी **गणेश रघुनाथ बनसोडे, वय २५ वर्षे, रा. अजंठानगर, बी पत्राशेड, निगडी पुणे** यास गुंडा विरोधी पथकाचे अधिकारी व स्टाफने त्याचे रहाते घराजवळुन ताब्यात घेवुन त्याचेवर निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ८१२/२०२२, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा नोंद केलेला आहे.

- तसेच इन्स्टाग्राम या सोशल मिडीयावर krishna.king_307_ या प्रोफाईलव्दारे एका रिल्समध्ये एक इसम हातात लोखंडी कोयता घेवुन तो उजवे भुवईचे वर लावुन बॅकराऊंडला हिंदी गाणे लावुन जनमाणसात भितीदायक संदेश प्रसारीत होईल असे कृत्य केल्याने इसम नामे **कृष्णा सिताराम पाल वय १९ वर्षे, रा. बौध्द वस्ती, आकुर्डी, पुणे** या दि. २६/११/२०२२ रोजी ताब्यात घेवुन त्याचे विरोधात निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ८१३/२०२२ भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन आरोपींना पुढील कारवाई करीता निगडी पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले आहे.

- अशा प्रकारेच्या गुंडा विरोधी पथकाने केलेल्या एकुण ०५ कारवायांमध्ये ०७ आरोपींना ताब्यात घेवुन ०३ गावठी पिस्तुले, ११ काडतुसे, ०६ लोखंडी कोयते, टोयोटा ग्लेन्झा कार व रिक्षा जप्त केले आहेत.

- सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे, सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रशांत अमृतकर व सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) पदमाकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली **गुंडा विरोधी पथकाचे** सहाय्यक पोलीस निरीक्षक एच.व्ही.माने, पोलीस अंमलदार - हजरत पठाण, प्रविण तापकिर, विक्रम जगदाळे, गंगाराम चव्हाण, विजय गंभिरे, सोपान ठोकळ, गणेश मेदगे, सुनिल चौधरी, मयुर दळवी, शाम बाबा, विजय तेलेवार, नितीन गेंगजे, शुभम कदम, राम मोहीते, ज्ञानेश्वर गिरी व तौसिफ शेख यांनी केली आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ २ व गुन्हे
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय